International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# प्रधान मंत्री पिक विमा योजना (PMFBY) एक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा

**श्री. राजु शिवनाथ मिसाळ[1], श्री. ज्ञानदेव एकनाथ झिने[2]**

*[1]संशोधक, मराठा विद्या प्रसारक समाजाचे, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर.*
*[2]संशोधन मार्गदर्शक, मुळा एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई, ता. नेवासा जि. अहिल्यानगर*

*Corresponding Author -* श्री. राजु शिवनाथ मिसाळ

**DOI - 10.5281/zenodo.18922831**

***सारांश :***

*शेती क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाते. मात्र शेती क्षेत्र आणि जोखीम यांचा कायमचा संबंध आहे. शेती पिके तथा उत्पादन घेत असताना अनेक नैसर्गिक आपत्तींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. अशा आपत्तीपासून, जोखमींपासून शेती क्षेत्राचे संरक्षण व्हावे यासाठी जोखीम व्यवस्थापन करताना पिक विमा महत्वाचा ठरतो. सदरील शोध निबंधामध्ये आतापर्यंत च्या एक चांगल्या प्रभावीपणे राबविल्या जात असलेल्या प्रधान मंत्री पिक विमा योजनेचा एक आढावा घेण्यात आलेला आहे. मराठवाड्यातील प्रधान मंत्री पिक विमा योजनेच्या कामगिरीचा अभ्यास करण्यात आला आहे.*

***मुख्य शब्द : पिक विमा, राष्ट्रीय पिक विमा, शेतकरी, प्रधान मंत्री पिक विमा, मराठवाडा.***

**परिचय :**

जगाच्या वाढत्या लोकसंख्येची भूख भागविण्याचे महत्त्वपुर्ण कार्य शेती व्यवसाय करते. भारतीय शेती ही कोट्यवधी लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन असून अन्न सुरक्षेमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावते. म्हणूनच शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र अशा महत्वपूर्ण असलेल्या शेती व्यवसायामध्ये खूप आव्हाने, नैसर्गिक संकटे येतात. शेतीमधील अन्न, पिके यांवर प्रतिकूल हवामानाचा विपरीत परिणाम दिसून येतो. शेती ही मुख्यतः नैऋत्य मोसमी पावसावर अवलंबून आहे आणि पाऊस हा कायमच साथ देईल याची शाश्वती नाही. कधी पूर, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टी, वादळ, भूस्खलन तर कधी किड रोगांचे संक्रमण यांसारख्या संकटांमुळे भारतीय शेती क्षेत्र हे अत्यंत जोखमीचे बनलेले आहे. अशा प्रकारच्या संकटांना मात देण्यासाठी जोखीम व्यवस्थापन करणे अत्यंत महत्वाचे आहे, त्यामध्ये पिक विमा योजना महत्त्वपूर्ण ठरते. यामुळे कीड - रोग, वादळ, अतिवृष्टी, दुष्काळ अशा नैसर्गिक संकटांपासून आर्थिक संरक्षण मिळते. परिणामी शेती क्षेत्रात स्थिरता येण्यास मदत होते.

स्वातंत्र्यानंतर अनेक प्रायोगिक तत्वावर तसेच वैयक्तिक, क्षेत्रीय तथा हवामान आधारित पिक विमा योजना चालू करण्यात आल्या. त्यात वैयक्तिक दृष्टिकोनावर आधारित १९७२ मध्ये पहिली H – ४ नावाने कापूस पिकासाठी सुरू करण्यात आलेली पिक विमा योजना, त्यानंतर १९७९ – ८० मध्ये भारतीय जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन (GIC) ने सुरू केलेली क्षेत्रीय दृष्टिकोनावर आधारित पायलट पिक विमा योजना, १९८५ – ८६ मध्ये व्यापक पिक विमा (CCIS), त्यानंतर १९९९ - २००० साली राष्ट्रीय कृषी विमा योजना (NAIS) लागू करण्यात आली त्यात सुधारणा करून २०१० – ११ पासून सुधारित राष्ट्रीय कृषी विमा (MNAIS) चालू करण्यात आली. मात्र एवढ्या वेळा सुधारणा करूनही या पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग कमीच राहिला. शेवटी

२०१६ साली मागील पिक विमा योजनांमधील उणिवा दूर करण्याच्या आणि अधिकाधिक शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याच्या हेतूने प्रधान मंत्री पिक विमा योजना PMFBY संपूर्ण देशभरात लागू करण्यात आली. जास्तीत जास्त पिके आणि जोखिमा विचारात घेऊन पिक विमा योजनेचा विस्तार करण्याचा आणि प्रिमिअम कमीत कमी करण्याच्या उद्देशाने 'एक राष्ट्र एक योजना' या ध्येयासह ही योजना अंमलात आली.

अगोदरच्या पिक विमा योजना मध्ये असलेल्या उणिवा दूर करून प्रधान मंत्री पिक विमा योजना एक सर्व समावेशक पिक संरक्षक योजना या दृष्टिकोनातून अंमलात आली. शेतकऱ्यांच्या शेतातील गहू, हरभरा, तूर, भात, मूग, उडीद, मका, कापूस अशा सर्व पिकांना संरक्षण देण्याच्या उद्देशाने चालू करण्यात आली. किंबहुना लागवड करण्यापासून ते पिक काढणीपर्यंत ची जोखीम व्यवस्थापन या योजने अंतर्गत केल्या जाते.

**पिक विम्याची गरज :**

शेती क्षेत्र म्हटलं की जोखीम ही आलीच, त्यामध्ये पिक लागवड करण्यापासून ते पिक काढणीपर्यंत अनेक जोखीम येत असतात. कधी पूर तर कधी कोरडा दुष्काळ, वादळ, अतिवृष्टी, किड रोगांचे संक्रमण यांच्यापासून संरक्षण मिळण्याच्या, आर्थिक नुकसान कमी करण्याच्या हेतूने पिक विमा या संकल्पनेचा उदय झाला. नैसर्गिक आपत्तींपासून शेती पिकांचे संरक्षण करण्यासाठी आणि झालेल्या नुकसानीपासून आर्थिक हातभार लाभावा यासाठी पिक विमा गरजेचा ठरतो.

**प्रधान मंत्री पिक विमा (PMFBY) :**

अगोदरच्या राष्ट्रीय कृषी विमा योजनेत शेतकऱ्यांना भरावा लागायचा विमा हफ्ता आणि कमी मिळणारी नुकसान भरपाई यांच्यात सुधारणा करून सदरील योजना अंमलात आणल्या गेली. अतिवृष्टी किंवा शेतात पाणी भरल्यास जे नुकसान होईल त्याचाही समावेश या योजनेत करण्यात आला, जो अगोदरच्या पिक विमा योजनांमध्ये नव्हता. शिवाय पिक काढणी पश्चात होणारे नुकसान सुद्धा या योजनेअंतर्गत भरपाई साठी पात्र राहील आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल. तसेच या योजनेअंतर्गत झालेल्या नुकसानीसंदर्भात लवकर माहिती मिळावी यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येणार. ज्यामुळे शेतकऱ्यांना झालेली नुकसानभरपाई त्वरित मिळावी.

सदरील प्रधान मंत्री पिक विमा योजनेत अगोदरच्या पिक विमा योजनांमध्ये शेतकऱ्यांकडून घेतला जाणारा पिक विमा संरक्षित रकमेचा आगाऊ हफ्ता कमी करण्यात आला. योजनेत खरीप हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांकडून एकूण पिक विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के एवढा प्रीमियम घेतला जातो तर उर्वरित भरणा शासनाद्वारे केला जातो. त्याचप्रमाणे रब्बी हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांकडून एकूण पिक विमा संरक्षित रकमेच्या १.५ टक्के एवढा प्रीमियम घेतला जातो आणि उर्वरित भरणा शासनाद्वारे केला जातो. शिवाय बारमाही किंवा नगदी पिकांसाठी शेतकऱ्यांकडून एकूण पिक विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के एवढा प्रीमियम घेतला जातो आणि उर्वरित भरणा शासनाद्वारे केला जातो.

**उद्दिष्टे:**

1. अधिसूचित पिकांपैकी कोणतेही पिक नैसर्गिक आपत्ती, किड रोगांचे संक्रमण यांमुळे खराब झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण आणि आर्थिक मदत करणे.
2. शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात स्थिरता आणणे.
3. शेतीमध्ये नवतंत्रज्ञानाचा वापर करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे.
4. शेतीसाठी कर्जाचा पुरवठा करणे.

**पिकांची व्याप्ती :**

1. सर्व अन्नधान्ये (तृणधान्ये, डाळी, बाजरी, भरड धान्य ई.)
2. तेलबिया
3. नगदी बारमाही पिके

**जोखीम व्यवस्थापन:**

1. पेरणी, लागवड रोखणे
2. प्रधान मंत्री पिक विमा योजनेत पिकांच्या जोखीम चक्रातील सर्व धोके आणि टाळता न येणारी जोखीम यांचा समावेश होतो आणि त्यापासून पिकांना संरक्षण मिळते.
3. हंगामाच्या मध्यातील आपत्ती
4. पेरणी ते पिक काढणीपर्यंत येणारी आपत्ती
5. पिक काढणी पश्चात होणारे नुकसान
6. प्राण्यांमुळे होणारे नुकसान
7. स्थानीक आपत्ती .

**विम्याची रक्कम:**

प्रत्येक अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिकांकरिता आगाऊ रक्कम निश्चित केली जाते. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी विमा हफ्ता रक्कम समान आहे. विम्याची रक्कम आर्थिक स्तरावर जिल्हास्तरीय तांत्रिक समितीद्वारे निश्चित केली जाते. जेव्हा जिल्हा तांत्रिक समितीद्वारे हे निश्चित केले गेले नाही, तेव्हा राज्य सरकार उत्पन्न आणि इतर तत्सम माहितीच्या आधारे विम्याची रक्कम निश्चित करते. शिवाय बागायती आणि कोरडवाहू शेती पिकांसाठी विम्याच्या रकमेत तफावत असते.

**संशोधन पद्धती :**

सदरील अभ्यासासाठी शासकीय अहवाल, निरीक्षणे, शोध निबंध, संशोधन लेख अशा दुय्यम सामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**साहित्याचा आढावा:**

**के कृष्णा रेड्डी (२०२०):** सदरील शोध निबंधामध्ये प्रधान मंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पिक विमा योजनेचा राज्य निहाय अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये तेलंगणातील जिल्हा निहाय पिक विमा योजनेचे विश्लेषण केलेले आहे. दुय्यम सामग्रीवर आधारित या शोध निबंधामध्ये शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी अभ्यास मांडण्यात आलेला आहे. त्यात संशोधकाने शेतकऱ्यांना गरजेचे असलेली शेती साधने व प्रणाली मध्ये सुधारणा केल्यास शेतकरी प्रगत होऊ शकतात, असे निष्कर्ष उल्लेखित केलेले आहे.

**डॉ. मनिषा आणि हरप्रित कौर (२०१९) :** या शोध निबंधामध्ये भारतातील कृषि विम्याची कामगिरी आणि व्याप्तीचे मूल्यांकन केलेले आहे. सदरील शोध निबंधामध्ये हा राष्ट्रीय पिक विमा, सुधारित राष्ट्रीय पिक विमा आणि प्रधान मंत्री पिक विमा योजना यांचे विश्लेषण केलेले आहे. सदरील शोध निबंधातील निष्कर्षामध्ये पिक विमा हे शेती क्षेत्राला जोखमींपासून संरक्षण देण्यात महत्वाची भूमिका बजावते.

**आदित्य के. एस., मोहम्मद ताजुद्दीन खान आणि अविनाश किशोर (२०१८) :** या शोध निबंधामध्ये पिक विमा योजनांचा अवलंब आणि त्यांचा परिणाम यांचे विश्लेषण केलेले आहे. शिवाय पिक विमा खरेदी, शेती उत्पन्न, उत्पादन आणि खर्च या शेतकऱ्यांच्या निर्णयावर परिणाम करणाऱ्या घटकांचे मूल्यांकन केलेले आहे.

**रुचबाह राय (२०१९) :** या शोध निबंधामध्ये प्रधान मंत्री पिक विमा योजनेचे मूल्यांकन केले आहे. सदरील अभ्यासासाठी दुय्यम सामग्री आधारे प्रधान मंत्री पिक विमा योजनेचा आढावा, योजनेची कामगिरी, पिक विमा योजनांची

तुलना, पिक विम्याचे निर्देशक, पिक विम्याचे स्वतंत्र तर्क, वैशिष्ट्ये यांचा अभ्यास व विश्लेषण करण्यात आलेले आहे. निष्कर्षामध्ये संशोधकांनी असे नमूद केलेले आहे की, भाडेतत्वावर शेती करणारे व महिला शेतकरी यांचा समावेश करणे महत्त्वपूर्ण आहे. संशोधकाच्या निष्कर्षांवरुन असे लक्षात येते की शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी सकारात्मक सुधारणा करण्याची गरज आहे.

**मराठवाडा विभाग:**

प्रधान मंत्री पिक विमा योजना (PMFBY) च्या पहिल्या वर्षापासून म्हणजेच 2016 खरीप हंगापासून देश आणि महाराष्ट्रासोबतच मराठवाड्यातील शेतकरी सुद्धा मोठ्या संख्येने या योजनेत सहभागी होत आहेत. सन 2016 ते 2020 या कालावधीतील मराठवाड्यातील प्रधान मंत्री पिक विमा योजनेत खरीप हंगामातील सहभागी शेतकरी आणि नुकसान भरपाई लाभार्थी शेतकरी यांचा अभ्यास सदरील शोध निबंधामध्ये करण्यात आला.

**खरीप हंगाम 2016:**

प्रधान मंत्री पिक विमा योजनेच्या पहिल्याच वर्षात मराठवाड्यातील ७४४७९६७ एवढ्या शेतकऱ्यांनी २४३४२८६ हेक्टर जमिनीवरील पिकांच्या पिक विम्यासाठी अर्ज केले. ज्यामध्ये १०२७२.४ कोटी संरक्षित रकमेकरीता २३९१.३४ कोटी एवढा विमा हप्ता भरण्यात आला. त्यापैकी २३८९६२७ एवढ्या अर्जदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी १६७०.१७ कोटी एवढी रक्कम वितरीत करण्यात आली, जी एकूण पिक विमा अर्ज केलेल्या शेतकऱ्यांच्या तुलनेत फक्त ३२.०८ टक्के एवढी आहे. यावरून असे लक्षात येते की, मागील पिक विमा योजनांच्या उणिवा दूर होऊन प्रधान मंत्री पिक विमा योजना ही शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर ठरेल या आशेने अधिकाधिक शेतकरी सहभागी झाले. मात्र एकूण अर्जदार शेतकऱ्यांपैकी नुकसान भरपाई मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. म्हणजेच शेतकऱ्यांनी ज्या प्रमाणात उत्साहाने या योजनेत सहभाग नोंदविला त्याप्रमाणात त्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही.

**खरीप हंगाम २०१७:**

या खरीप हंगामात ६७६९२४४ एवढ्या शेतकऱ्यांनी ३२३८३८९ हेक्टर जमिनीवरील पिकांसाठी पिक विम्यासाठी अर्ज केले. त्यापैकी ४२०८२६५ एवढ्या शेतकऱ्यांना १८५९.०३ कोटी एवढी रक्कम वितरीत करण्यात आली, जी एकूण अर्जदार शेतकऱ्यांच्या ६२.१७ टक्के एवढी आहे.

**खरीप हंगाम २०१८:**

यावर्षी मराठवाड्यातील ७१०२००० एवढ्या शेतकऱ्यांनी ३४५९८०० हेक्टर जमिनीवरील पिकांसाठी पिक विमा योजनेत सहभाग नोंदविला. त्यापैकी ५७.५९ टक्के म्हणजेच ४०९०००० एवढ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी २८६९.०६ कोटी एवढी रक्कम वितरीत करण्यात आली. म्हणजेच एकूण अर्जदार शेतकऱ्यांच्या तुलनेत निम्म्यापेक्षा थोडे अधिक शेतकऱ्यांना लाभ मिळाला.

**खरीप हंगाम २०१९ :**

२०१९ च्या खरीप हंगामात मराठवाड्यातील ८८८८५१२ एवढ्या शेतकऱ्यांनी ३९७९९७५ हेक्टर जमिनीवरील पिकांसाठी पिक विमा अर्ज केले. त्यापैकी ६३.०४ टक्के म्हणजेच ५६०३७०३ एवढ्या अर्जदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी ३३३९.६४ कोटी रक्कम वितरीत करण्यात आली.

**खरीप हंगाम २०२० :**

२०२० च्या खरीप हंगामात मराठवाड्यातील ७३६७६६१ एवढ्या शेतकऱ्यांनी ३४२०१७७ हेक्टर जमिनीवरील पिकांसाठी पिक विमा योजनेत सहभाग नोंदविला त्यापैकी १२.२० टक्के म्हणजेच ८९९१४४ एवढ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी ५६२.८२ कोटी रुपये एवढी रक्कम वितरीत करण्यात आली. यावरून असे दिसून येते की, ज्याप्रमाणात शेतकरी प्रधान मंत्री पिक विमा

योजनेत सहभाग घेतात त्यामानाने नुकसान भरपाई मिळणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या खूप कमी आहे.

**निष्कर्ष व शिफारशी:**

वरील अभ्यासावरून असे लक्षात येते की, मागील काळातील पिक संरक्षण योजना म्हणाव्या तितक्या प्रभावी नव्हत्या. त्या योजनांमधील त्रुटी, उणिवा दूर करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा सहभाग पिक विमा योजनेत वाढावा या उद्देशाने २०१६ साली प्रधान मंत्री पिक विमा योजना (PMFBY) सुरू करण्यात आली. प्रधान मंत्री पिक विमा योजना ही अगोदरच्या योजनांपासून जास्त लाभदायक ठरत आहे. पहिल्या वर्षी मात्र ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना अपेक्षा लागून होत्या त्याप्रमाणात त्यांना लाभ मिळाला नाही. २०१६ च्या खरीप हंगामात एकूण अर्जदार शेतकऱ्यांपैकी केवळ ३२ टक्के शेतकऱ्यांना प्रधान मंत्री पिक विमा योजनेचा लाभ मिळाला. नंतरच्या काळात कधी ५० टक्के तर कधी ६० टक्के एवढ्या अर्जदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली. २०२० च्या खरीप हंगामात एकूण अर्जदार शेतकऱ्यांच्या तुलनेत मात्र १२ टक्के एवढ्याच शेतकऱ्यांना लाभ प्राप्त झाला. नुकसान भरपाई म्हणून मिळणारी कमी रक्कम यांमुळे देखील शेतकऱ्यांमधील सहभागी होण्याचा उत्साह कमी होण्यास कारणीभूत ठरतो. परिणामी शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात का होईना पिक विमा योजनेत सहभागी होण्याचा उत्साह कमी होण्यामागे अशी कारणे कारणीभूत ठरतात. या प्रधान मंत्री पिक विमा योजनेत सीमांत शेतकरी सहभागी होण्याकरिता त्यांच्याकडे आर्थिक टंचाई असते आणि त्यातही निसर्गाने साथ दिली नाही आणि पिक विमा योजनेचा पुरेसा लाभ मिळाला नाही तर त्यांना अशा पिक व्यवस्थापन करण्यात खूप अडचणींचा सामना करावा लागतो.

प्रधान मंत्री पिक विमा योजनेत प्रीमियम खर्च, नुकसान भरपाई मिळण्यात होणारी दिरंगाई, पिक विमा योजनेबद्दलचा समज आणि या योजनेबद्दल शेतकऱ्यांमध्ये असलेला संभ्रम अशा अडचणी लक्षात येतात. म्हणून शासनाने अशा अडचणींचा, समस्यांचा निपटारा करून शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त सहभाग कसा वाढेल यावर लक्ष केंद्रित करायला हवे. सोबतच शेतकऱ्यांमध्ये या योजनेविषयी असलेले संभ्रम दूर करण्यासाठी गावोगावी मार्गदर्शक शिबिरे आयोजित करून शेतकऱ्यांना योजनेविषयी पूर्ण माहिती देऊन आश्वास्त करावे. शिवाय आगाऊ विमा रक्कम दर कमी करावा सोबतच नुकसान भरपाई म्हणून मिळणारी रक्कम वाढविण्यात यावी जेणेकरून शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचा हातभार लाभेल.

**संदर्भसाहित्य :**

1. Aditya K. S., Md Tajuddin Khan and Avinash Kishore,(२०१८) : Adoption of Crop Insurance and Impact : insights from India, Agricultural Economics Research Review 2018, 31(2), 163-174.
2. Dr. Manisha and Harpreet Kaur (2019) : Crop Insurance Scheme in India : A Glance, International Journal of Trend in Scientific Research and Development (IJTSRD), Vol.3 ISSUE 5, August 2019.
3. Ruchbah Rai (2019) : Pradhan Mantri Fasal Bima Yojana : An assessment of India’s crop insurance scheme, Observer Research Foundation, May 2019.
4. Mishra Shruti and Varma Vikas : Crop Insurance and it’s Role in Indian Agriculture : A Comprehensive Review, Biological Forum – An International Journal, 15(10) : 624-630(2023).

5. Miss Aradhana Gorakhnath Kokare : Evaluation of the Pradhan Mantri Fasal Bima Yojana (PMFBY) in Sangli District, EPRA International Journal of Economic and Business Review – Peer Reviewed Journal, Vol. 12, August 2024.
6. मुक्ता कुलकर्णी आणि केदार देशमुख : पंतप्रधान पिक विमा योजना महाराष्ट्र : एक मूल्यमापन, (संशोधन प्रकल्प) युनिक फाऊंडेशन, पुणे.
7. https://pmfby.gov.in/